**राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्याकरिता जागा निश्चित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१०/प्रक्र-३०५/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० ऑगस्ट, २०१२.

**वाचा :** १) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.संकीर्ण-२०१०/प्रक्र-३०५/११-अे, दि.१२.१०.२०११.
२) शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०१०/प्रक्र-३०५/११-अे, दि.३०.३.२०१२.
३) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.संकीर्ण-२०१०/प्रक्र-३०५/११-अे, दि.३.८.२०१२.
४) आयुक्त (कृषि) यांचे पत्र क्र.का.सां.७/स्व.ह.कें./११३/२०१२, दि.१३.७.२०१२.

**प्रस्तावना :-**

कृषि व पदुम विभागाच्या उपरोक्त दि.१२.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या केंद्रांद्वारे दैनंदिन पर्जन्यमान, कमाल व किमान तापमान, सापेक्ष आर्द्रता, हवेचा दाब, वाऱ्याचा वेग व दिशा इत्यादी हवामानविषयक घटकांच्या नोंदी घेण्यात येणार असून त्या नोंदीचा उपयोग त्या परिसरातील कृषि विषयक प्रयोजनासाठी करण्यात येणार आहे. सदरचा प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. या केंद्रासाठी महसूल मंडळ स्तरावर योग्य ठिकाणी व विहित वेळेत जागेची निवड करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करणे हा राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या केंद्रांद्वारे दैनंदिन पर्जन्यमान, कमाल व किमान तापमान, सापेक्ष आर्द्रता, हवेचा दाब, वाऱ्याचा वेग व दिशा इ. हवामान विषयक घटकांच्या नोंदी घेण्यात येणार असून त्या नोंदीचा उपयोग त्या परिसरातील कृषि विषयक प्रयोजनासाठी करण्यात येणार आहे.

२. कृषि विषयक प्रयोजनामध्ये प्रामुख्याने विविध हवामान घटकाच्या नोंदीवर आधारित स्थानिक पातळीवर पिकांसाठी कृषि विषयक सल्ला, पिकांवरील किड व रोगांची पुर्वसूचना देणे, आपत्ती व्यवस्थापन, पिकांसाठी हवामान आधारित विमा योजना, हवामानाचे पूर्वअनुमान निश्चित करणे या बाबींचा समावेश राहील. हवामान केंद्रांची लवकरात लवकर उभारणी करणे शक्य व्हावे व काही अडचणी आल्यास त्या तात्काळ सोडविणे शक्य व्हावे, यासाठी

स्थानिक स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सदस्य |
| ३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत) | - | सदस्य |
| ४) जिल्हा आरोग्य अधिकारी (जि.प.) | - | सदस्य |
| ५) जिल्ह्यातील कृषि विद्यापीठ/कृषि संशोधन केंद्र/कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी शास्त्रज्ञ | - | सदस्य |
| ६) कृषि विकास अधिकारी | - | सदस्य |
| ७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य सचिव |

३. उपरोक्त समितीने हवामान केंद्रांसाठीच्या मानकानुसार जागा निश्चित करुन जागेचा सविस्तर तपशिल कृषि आयुक्तालयास सादर करावयाचा आहे. स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीसाठी जागा निश्चितीच्या मानकानुसार शासनाच्या इतर विभागांच्या अखत्यारितील जागेची आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांना त्यांचे अधिकारात सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस, सामाजिक वनीकरण, वनविभाग इ. विभागांचे जिल्हास्तरावरील प्रमुखांना समितीचे सदस्य म्हणून घेण्याचे अधिकार राहतील. जागेच्या निश्चितीनंतर हवामान केंद्रांची खाजगी गुंतवणूकदारामार्फत उभारणी करताना जिल्ह्यातील हवामान केंद्राच्या कामावर देखरेख ठेवणे, उभारणी कामाचा आढावा घेणे व येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे इत्यादी जबाबदाऱ्या समितीने पार पाडावयाच्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श.बा.पाविसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (कृषि)/मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
प्रधान सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर
कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी